**लोकलेखा समितीचा सन २००२-०३ च्या १२ व्या अहवालातील परिच्छेद ४.४अ, ६.२, ६.३ व ३.४.६(१) मधील वसूलीची प्रकरणे निर्लेखित करण्याबाबत.**

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्रमांक : लोलस-२००६/३१८४/प्र.क्र.४७१/म-१
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १८/१/२००७

**शासन निर्णय :-**

लोकलेखा समितीचा बारावा अहवाल परिच्छेद ४.४(अ), ६.२, ६.३ व ३.४.६(एक) दि.८/४/०३ रोजी विधीमंडळास दोन्ही सभागृहात सादर करण्यात आला असता लोकलेखा समितीने परिच्छेद क्र.३.४.६ (एक) बाबत प्राप्त झालेल्या अभिप्रायानुसार तसेच नोंदणी महानिरिक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी क्र.का-६/लोलेस ०२-०३/बारावा अहवाल/१६७८, दि.३/११/०६ च्या पत्रान्वये सादर केलेल्या प्रस्तावास अनुसरुन १९८० पासूनची जवळपास १ लाख ४८ हजार इतकी प्रकरणे शोधून काढण्यात आली. या प्रकरणांमध्ये वसूली करावयाच्या २६ कोटी इतक्या रकमेपैकी १३ कोटींची वसूली झालेली आहे व उर्वरित १३ कोटी रुपयांची वसूली अद्याप व्हावयाची आहे. यामध्ये ५०० रुपयांपेक्षा कमी वसूली असलेली प्रकरणे १ लाखांच्या वर आहेत. यामध्ये फक्त ६.५० लाख रुपयांची वसूली करावयाची असल्याने वसूलीपेक्षा खर्च अधिक होणार असल्याने ५०० पेक्षा कमी वसूलीची प्रकरणे निर्लेखित करण्यास शासनाची मंजूरी देण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

स्वा. य. सावंत
( स्वा. य. सावंत )
कार्यासन अधिकारी
महसूल व वन विभाग.

प्रति,

नोंदणी महानिरिक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
सर्व विभागीय आयुक्त /सर्व जिल्हाधिकारी तथा जिल्हा निबंधक
मुद्रांक अधिक्षक, मुंबई / संचालक, नगररचना, पुणे
सर्व विभागीय नोंदणी उपमहानिरिक्षक व मुद्रांक उपनियंत्रक
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)महाराष्ट्र, मुंबई / नागपूर
महालेखापाल (लेखापरीक्षा)महाराष्ट्र, मुंबई / नागपूर
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई / सर्व सह जिल्हा निबंधक/सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई / दुय्यम निबंधक व प्रशासकीय अधिकारी, मुंबई बाहा
सर्व उपजिल्हाधिकारी (मुद्रांक व मुल्यांकन)/ निवासी लेखाधिकारी, मुंबई
शासकीय छायाचित्रण नोंदणी कार्यालय, पुणे.
विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई / वित्त विभाग (व्यय-१०)/(वित्तीय सुधारणा), मंत्रालय, मुंबई.
सर्व कार्यासने, महसूल व वन विभाग, मंत्रालय/ निवडनस्ती (म-१), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई